सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

Government of Maharashtra
**Police Department**
Office of the Commissioner of Police,
Dr. D.N. Road, Mumbai-400001.

Tel. No.: 022-22620332
Email : pressroom.mum@mahapolice.gov.in

---

O.W.No. / 2021 Date :- 14/ 09 / 2021

# प्रेस नोट

दिनांक १०/०९/२०२१ रोजी साकीनाका पोलीस ठाणेच्या हद्दीत पहाटे ०३:२० वा. चे सुमारास एक व्यक्तीने पोलीस नियंत्रण कक्षास फोनद्वारे कळविले की, वसंत ट्रेडींग कंपनी, रशीद कंम्पाउंड, खैराणी रोड, साकीनाका येथे एक टेम्पोमध्ये एका महिलेस मारहाण होत आहे. नियंत्रण कक्षाचा संदेश प्राप्त होताच साकीनाका पोलीस ठाणेचे अधिकारी व अंमलदार मोबाईल ५ वाहनासह तेथे पोहचले. पिडीत महिला गंभीर असल्याने रूग्णवाहिकेची वाट न पाहता साकीनाका पोलीस ठाणेचे पोलीस अंमलदार रमेश आहेर यांनी तोच टेम्पो चालु करून जखमी महिलेस राजावाडी येथे उपचारकामी तात्काळ दाखल केले. डॉक्टरांनी दिलेला अभिप्राय व सदरची घटना प्रत्यक्ष पाहणारी व्यक्तीने दिलेल्या तक्रारीवरून साकीनाका पोलीस ठाणेस गु.र.क्र. ९३७/२१ कलम ३७६, ३०७, ५०४, ३४ भा.दं.वि. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची घटना संवेदनशील असल्याने परिमंडळ – १० चे पोलीस उप आयुक्त श्री. महेश्वर रेड्डी यांनी आरोपीचा शोध घेण्यासाठी विविध तपास पथके तयार केली. तपास पथकांनी घटनास्थळ तसेच परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली व गुप्त बातमीदाराच्या मार्फतीने आरोपीचा शोध घेवून १२ तासाच्या आत आरोपीस अटक केले.

सदर गुन्हाचा पुढील तपास करत असताना गुन्हयामध्ये कलम ३०२ भा.दं.वि. सह कलम ३ (१), डब्लु ३(२)(V) अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती १९८९ प्रमाणे कलमात वाढ करण्यात आली आहे.

सदर गंभीर व संवेदनशील गुन्हयामध्ये बळीत महिलेस तात्काळ वैद्यकीय उपचारासाठी राजावाडी हॉस्पीटल येथे दाखल करण्यात आले व आरोपीस १२ तासाचे आत अटक करून केलेल्या प्रशंसनीय व उल्लेखनीय कामगिरीबद्दल पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बळवंत देशमुख, पो.नि. दत्तात्रय धुमे, सहा. पोलीस निरीक्षक मच्छिंद्र जाधव, सहा. पोलीस उप निरीक्षक वारांगळे, पो.शि.क्र. ०९१९४/रमेश आहेर, म.पो.शि. क्र. ११३३८०/ रिना जगताप यांना आज दि. १४/०९/२०२१ रोजी १२:३० वा. मा. श्री. हेमंत नगराळे, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई शहर व श्री. विश्वास नांगरे पाटील, सह पोलीस आयुक्त (का व सु), बृहन्मुंबई यांनी बृहन्मुंबई पोलीस आयुक्त कार्यालय येथे विशेष पारितोषिक व प्रशस्तीपत्र देऊन त्यांचा गौरव केलेला आहे.

( चैतन्या एस. )
पोलीस उप आयुक्त (अभियान),
जनसंपर्क अधिकारी,
पोलीस आयुक्त कार्यालय, मुंबई.